Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts

GRT

# वृत्तपत्र : उपजिवीकेचे साधन

प्रा. राणी शेंडकर
मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर,बारामती, पुणे.

## प्रास्ताविक

वृत्तपत्रे आणि दूरदर्शनचा शोध लागल्यापासून मानवी जीवनाचा बराचसा भाग प्रसारमाध्यमांनी व्यापला आहे. माणूस जसजसा प्रगत होत गेला तसतशी प्रसारमाध्यमांची त्याची गरज वाढत गेली. प्रसारमाध्यमे हा लोकशाहीचा चौथा आधरस्तंभ मानला जातो. त्यामुळे प्रसारमाध्यमांची जबाबदारी देशात फार मोठी ठरते. प्रसारमाध्यमात प्रामुख्याने मुद्रीत (प्रिंट) आणि प्रक्षेपक (इलेक्ट्रॉनिक) माध्यमांचा समावेश होतोय सध्या प्रक्षेपक माध्यमांचा बोलबाला असला तरी अजूनही मुद्रीत माध्यमांवर लोकांचा कमालीचा विश्वास आहे वृत्तपत्रे हा मुद्रीत माध्यमाचाच प्रकार आहे. प्रक्षेपक माध्यमांचा प्रवेश झाल्यानंतर वृत्तपत्र माध्यमांचे काय होणार असा अस्तित्वाचा प्रश्न उपस्थित झाला होता. या माध्यमांचा काहीसा फटका छोट्या वृत्तपत्रांना पडलाही असेल. परंतु अनेक दैनिक टिकून राहिली किंबहुना त्यांच्या संख्येत वाढ होत गेली. याचे कारण म्हणजे वृत्तपत्रांची सामाजिक बांधीलकी, विश्वासार्हता आजही टिकून आहे.

बाळशास्त्री जांभेकर यांनी 1832 साली दर्पण हे वृत्तपत्र काढून वृत्तपत्रसृष्टीची सुरवात केली. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांच्या जगात आजही ही वृत्तपत्रे घराघरात जात आहेत. लोकांच्या आवडीनिवडीनुसार वृत्तपत्रांचा चेहरामोहरा बदलत चालला आहे. वृत्तपत्र हे समाजजीवनाचे प्रतिबिंब असते. समाजातील नानाविध घडामोडी विविध विषय, घटना, प्रसंगी, बातम्या, मनोरंजन, शिक्षण, राजकारण, सामाजिक, राजकीय, क्रीडा यातील नवे विषय, नव्या पुरवण्या, नवी आव्हाने, नवी संकटे यांची प्रामाणिक दखल वृत्तपत्र घेताना दिसून येते.




अगदी अलिकडिच्या काळाचा विचार करता उपजिवीकेच साधन म्हणून देखील वृत्तपत्रांकडे पाहिले जात आहे. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दैनिक लोकसत्ता, देनिक पुढारी, दैनिक सामना, दैनिक लोकमत, दैनिक केसरी, दैनिक प्रभात, दैनिक पुढारी, दैनिक गावकरी, दैनिक पुण्यनगरी, तरूण भारत, ऐक्य, संध्यानंद इत्यादी वृत्तपत्रे महाराष्ट्रात कार्यरत आहेत. सरकार, कायदेमंडळ, न्यायालय या लोकशाहीच्या तीन स्तंभांनतर वृत्तपत्रे हा चौथा स्तंभ मानला जातो. अशा या वृत्तपत्र प्रसार माध्यमात लेखन, संपादन, निर्मिती, वितरण, छपाई करून असंख्य लोक अर्थार्जन करत आहेत.

## वृत्तपत्र लेखनातून अर्थार्जन

वृत्तपत्रात बातम्या, अग्रलेख, सदरे, क्रीडावृत्त, राजकीय व शैक्षणिक माहिती, देशविदेशातील महत्त्वाच्या घटनांची माहिती असते. अनेक प्रकारात स्वतंत्रपणे लिहून अर्थार्जन करून करिअर घडविणारे अनेक आहेत. त्याचबरोबर दररोज विविध प्रकारच्या प्रकाशित होणाऱ्या पुरवण्यांमधून लेखन करायला संधी मिळते. उदा. दैनिक सकाळमधील सप्तरंग, गुदगुल्या, मुक्तपीठ, प्रतिबिंब, आधारवड, जागर, प्रगती अशा पुरवण्यामध्ये स्वतंत्र लेखन करून अर्थार्जन करतात. कथा, कविता, चित्र, अध्यात्म, अर्थविषयक, सामाजिक, समीक्षा, प्रवासवर्णन, क्रीडा चिंतनात्मक अशी विविध सदरे वृत्तपत्रातून दिसून येतात. या सदरामध्ये लखन करून अर्थार्जन करणरे अनेक लेखक पहावयास मिळतात. काहींचा छंद आणि अर्थार्जन या दोन्ही गरजा भागतात. त्यामुळेच वृत्तपत्रातील साहित्यिक लेखनातूनही मराठी साहित्य आणि मराठी भाषा समृध्द होताना दिसते.

मराठी वृत्तपत्रातून खऱ्या अर्थाने मराठी साहित्य समृध्द होते ते शनिवार, रविवारच्या पुरवण्यांमधून. या पुरवण्यांतील साहित्याला विशिष्ट दर्जा असतो. अशोक नायगावकरांपासून नव्या कवयित्री कल्पना दुधाळ यांच्यापर्यंत तर राज काझी यांच्यापासून मनस्विनी लता रविंद्र यांच्यापर्यंत अनक विविध साहित्यप्रकारातील लेखकांनी वृत्तपत्रांत लेखन केले. उदा.कै. शिवाजीराव भोसले यांचे जागर हे सदर तर प्रवीण टोकेकर यांचे ढींग टांग हे सदर खूप गाजले. उत्तम कांबळे या साहित्यिकाने तर वृत्तपत्र माध्यमातच आपले करिअर घडविले. याशिवाय

अनेक छोटे मोठे लेखक देखिल वृत्तपत्रासाठी लिहितात. आपल्या अवतीभोवतीचा विशिष्ट समाज, संस्कृती, चालीरीती, परंपरा याचे दर्शन विविध कथा, कविता, ललितलेख ही वृत्तपत्रातून प्रसिध्द झाल्याने घरबसल्या ज्ञान करून देणारे प्रमुख प्रसारमाध्यम म्हणून वृत्तपत्राचाच क्रमांक वरचा येतो. अशा साहित्यलेखनातून मराठी भाषेच्या संवर्धनाबरोबरच लेखकांचे अर्थार्जनही होते. अर्थात हे अर्थार्जन हिंदी व इंग्लिश भाषिक वृत्तपत्रांच्या तुलनेत खूप कमी असते हेही वास्तव आहे.

### *वृत्तपत्राच्या विविध विभागांतून अर्थार्जन*

वर्तमानपत्रात संपादकीय विभाग आत्मा असतो. यामध्ये मुख्य संपादक, निवासी संपादक, सहसंपादक, वृत्तसंपादक, अर्थविषयक संपादक, उपसंपादक, मुख्य बातमीदार, बातमीदार अशी साधारणतः रचना असते यातील प्रत्येकास वृत्तपत्रात काम केल्याच्या बदल्यात मोबदला मिळतो. बातमीदारांना बातम्या जमा करून पाठविल्यावर विशिष्ट पगार दिला जातो किंवा बातम्यांच्या आकारावर मानधन दिले जाते. उपसंपादक बातम्यांना शीर्षक देणे किंवा दुरूस्ती करण्याची कामे करतात तर सहसंपादक सर्व विभागांचा मेळ घालण्याचे काम करतात म्हणून त्यांना पगार मिळतो. निवासी संपादक, मुख्य संपादक, हे वृत्तपत्राला दिशा देतात. नियोजन करतात. त्यांची मानधने समाधानकारक असतात. याशिवाय या संपादकीय विभागास मदत करणारे मुद्रीत शोधक, अक्षरजुळणीकार यांनाही रोजगार उपलब्ध होतो.

छपाई विभागात यंत्रणा चालविणारे कंपोझीटर, फोरमन व त्यांचे सहकारी यांना रोजगार उपलब्ध होतो. वितरण विभाग हेही एक मोठे जाळे असते. मुख्य एजंट, सबएजंट यांच्यामार्फत घराघरापर्यंत वितरण होते. त्यांना आकर्षक कमीशन दिले जाते छपाईनंतर गावांपर्यंत अंक घेऊन जाणारे वाहतूकदार हेही वितरण व्यवस्थेचा भाग आहेत. गावातील, शहरातील वितरकांवर बऱ्याचदा अंकाचा खप अवलंबून असतो. त्यामुळे वृत्तपत्र क्षेत्रात वितरकालाही महत्त्व आहे अतिजलद व्यवस्था पुरवणाऱ्या वितरकाचा दबदबा असतो. वितरकाने मदतीसाठी गावपातळीवर नेमलेल्या कार्यकर्त्यांनाही रोजगार मिळतो.

जाहीरात ही पासष्टवी कला आहे. बदलत्या काळात जाहीरातीला अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. जाहीरातीमुळे वृत्तपत्रांचे उत्पन्न वाढते. मोजक्या शब्दात आकर्षक जाहीरात मांडणाऱ्या नवोदित लेखकांना महत्त्व आले आहे. त्यांना जाहीरातीचे तंत्र अभ्यासावे लागते. माध्यमानुसार जाहीरातीचे स्वरूप बदलत असते. जाहीरात हेच वृत्तपत्रांचे महत्त्वाचे उत्तपन्नाचे साधन असते. त्यामुळे संपादकीय विभागापोठोपाठ वृत्तपत्रे जाहीरात विभागावर जादा लक्ष देतात. त्यामुळे वृत्तपत्रांनी जाहीरात एजन्सी दिलेल्या असतात. या एजन्सी चालविणाऱ्यांना वृत्तपत्र कमीशन देतात. त्यामुळे तोही व्यवसाय म्हणून अनेक तरूण स्वीकारताना दिसतात.

### *इतर प्रकारचे अर्थार्जन*

वृत्तपत्रांमध्ये आता संगणक विभाग निर्माण झाले आहेत. गावपातळीपर्यंत आता संगणक व इंटरनेटचा वापर करूनच वृत्तपत्रांचे लोक काम करतात. त्यामुळे हार्डवेअर, सॉफ्टवेअर क्षेत्रातील लोकांचे अर्थार्जन होते. काही वृत्तपत्रांनी सततची प्रदर्शने, कार्यक्रमांचे आयोजन, उपक्रम यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण केले आहेत. त्यामध्ये बांधकाम, कपडे, सोने, कृषी, हस्तकला, खाऊगल्ली अशा विविध गोष्टीची प्रदर्शने घेतली जातात. संगीत, नृत्य, सामाजिक विषयावरील कार्यक्रमांचे आयोजनही केले जाते. तर काही वृत्तपत्रे विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमही राबवितात. उदा. दैनिक सकाळचा सिल्क उपक्रम. याशिवाय बहुतेक दैनिके दिवाळी अंक, मासिके, क्रिडा वा सिनेमाविषयक मासिके चालवितात. त्यातूनही रोजगाराची शक्यता वाढते. दैनिक सकाळने तर प्रकाशन सुरू करून पुस्तकव्यवसायात बस्तान बसविले आहे.

आज जागतिकीकरणाच्या युगात प्रसारमाध्यमांच्या संख्येत वाढ होत आहे. काही माध्यमे सत्तापूरक, जाहीरातपूरक काम करत आहेत. सवतःला काळानुसार बदलत आहेत. अर्थार्जनाची संधी तरूणांना निर्माण करून देत आहेत. मराठी भाषेच्या जाणकारांची लेखकांची वृत्तपत्रांना गरज आहे. आजही चांगले बातमीदार, चांगले उपसंपादक यांच्या शोधात असतात. पितपत्रकारितेला लोक वैतागले आहेत. म्हणून उच्चशिक्षित, विचारी तरूणांनी वृत्तपत्रात काम करून अर्थार्जन व प्रतिष्ठा मिळवण्याची संधी आहे.

### *संदर्भग्रंथ*

1.प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा – संपादक डॉ. भास्कर शेळके, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे. एप्रिल 2012.
2.व्यवहारिक मराठी – डॉ. ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन कोल्हापूर, पाचवी आवृत्ती, 1999
3.संपादन : स्वरूप व कार्य – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, जून 2002.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org